जा.क्र./पोउआ/वाह/4003/२०१९

**प्रेसनोट** पुणे, दिनांक - 29 / ०४ /२०१९

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी पंकज देशमुख, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी (**अंतिम आदेश क्र २०/२०१७ दि.१६/०५/२०१७ अन्वयेचे वाहतुक निर्बंध**) या ठिकाणी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - 29/०४/२०१९ ते दिनांक - 23/०५/२०१९ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**बंडगार्डन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**१) चर्च रोडवरील किराड चौक ते समाजकल्याण आयुक्तालयापर्यत जाणा-या वाहनांना प्रवेश बंद करणेत येत आहे.(फक्त पोलीस आयुक्तालय कार्यालयात कामानिमित्त जाणारी वाहने वगळुन)**

**२) किराड चौकात आलेल्या वाहनांनी सरळ समाज कल्याण आयुक्तालयाकडे न जाता जी.पी.ओ.व नेहरु मेमोरिअल (साधु वासवानी रोड) चौकाकडून इच्छीत स्थळी जावे.**